**दिनांक - 03/11/25**

## विषय: संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पात सभासदांना मिळणाऱ्या घरांच्या मजल्यांच्या वाटपाची प्रक्रिया आणि त्या अनुषंगाने आयोजित विशेष सर्व साधारण सभा.

काल दिनांक 02/11/25 रोजी मुनोत सभागृहात संस्थेच्या पुनर्निर्माणात सभासदांना मिळणाऱ्या घरांच्या मजल्यांच्या अलोटमेंट साठी सभा घेण्यात आली ज्यात एकूण 102 पेकी 98 सभासद किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित होते. 3 सभासद किंवा त्यांचे प्रतिनिधी ह्या सभेला प्रत्यक्ष उपस्थित नसले तरी त्यांनी प्रेफरन्स फॉर्म्स भरून दिले होते आणि सोडणी प्रक्रियेत त्यांना अलोट होणारे फ्लॅट्स त्यांना मंजूर असल्याचे कळविले होते. एका सभासदा ची डुप्लेक्स युनिट च्या मालकीहक्का ची केस, त्यांच्या निधना नंतर न्याय प्रवीण असल्याने, त्यांच्या कडून कोणी ही सभे ला उपस्थित नव्हते मात्र त्यांच्या नावाने पण एक डुप्लेक्स युनिट अलोट करण्यात आली.

ह्या सभेला सहकारी खात्याच्या प्रतिनिधी सौ. वंदना प्रशांत गलांडे पाटील तसेच संस्थेचे पुनर्निर्माण प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडीकर आणि विधी सल्लागार ॲड. किरण काबरा ही उपस्थित होते.

सर्व प्रथम संस्थे चे अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर
सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी ह्या सभेचे तसेच त्यानंतर होणाऱ्या विशेष सर्व साधारण सभे चे प्रयोजन आणि अलोटमेंट प्रक्रिया कशी असेल हे विषद केले.

घरांच्या मजल्यांच्या अलोटमेंट ची संपूर्ण प्रक्रिया मोठ्या LED स्क्रीन वर संगणकाच्या मदतीने, सर्व सभासदांनी, त्यांनी दिलेल्या मजल्यांच्या / डुप्लेक्स च्या, प्रिफरन्स ची दखल घेत, पूर्ण पारदर्शक आणि सर्वमान्य पद्धतीने अत्यंत खेळीमेळी च्या वातावरणात पार पाडण्यात आली. ह्या allotment प्रक्रिये नंतर तीन सभासदांनी त्यांना अलोट होणारे फ्लॅट्स स्वीकार नसल्याचे तोंडी सांगितले.

अलॉटमेंट प्रक्रिये नंतर झालेल्या विशेष सर्व साधारण सभेत 98 सभासदांच्या / त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत अलोटमेंट झालेल्या फ्लॅट्स च्या मजल्यांच्या आणि डुप्लेक्स च्या क्रमांकाच्या एका प्रस्तावाला 95 विरुद्ध 3 अशा बहुमताने मान्यता देण्यात आली.

प्रस्ताव : "आज ची ही सर्व साधारण सभा फ्लॅट्स च्या झालेल्या मजल्यांच्या वाटपाला आणि डुप्लेक्स च्या क्रमांकाच्या वाटपाला मान्यता देत आहे."

सूचक : श्री श्रीवर्धन गाडगीळ
अनुमोदक : श्री जयंत शाळीग्राम

ह्या प्रसंगी संस्थेच्या पुनर्निर्माण योजनेच्या विधी सल्लागार ॲड. किरण काबरा यांनी सभासदांना संबोधित करून संस्थेच्या आत्ता पर्यंत झालेल्या पुनर्निर्माण प्रक्रिये चे विश्लेषण करून प्रकल्पाची पुढील वाटचाल कशी असेल ह्या वर प्रकाश टाकला. त्यांनी सभासदांच्या प्रश्नांना समर्थक आणि आश्वासक अशी उत्तरं ही दिली.

विशेष सर्वसाधारण सभे नंतर आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या विकसका तर्फे होणाऱ्या संपूर्ण प्रकल्पा चे बाह्य स्वरूप कसे असेल त्यावर एक छोटा व्हिडिओ वॉक थ्रू दाखविण्यात आला. नंतर बिल्डर तर्फे श्री संदीप माहेश्वरी यांनी प्रकल्पा ची संभावित टाईमलाइन सांगितली. त्यांच्या सांगण्या प्रमाणे सभासदांना घरांचा ताबा (बिल्डर ला) येत्या फेब्रुवारी किंवा मार्च अखेर पर्यंत द्यावा लागेल. त्यांनी हे ही स्पष्ट केले की सभासदांबरोबर व्यक्तिगत agreement घरांचा ताबा मिळाल्यानंतर पुढे 4 ते 6 महिन्यात करण्यात येईल. मात्र सोसायटी ने अलोटमेंट प्रक्रियेत जे फ्लॅट्स / डुप्लेक्स सभासदांना अलोट केले आहेत त्या प्रमाणे बिल्डर घरांचा ताबा घेण्या आधी प्रत्येक सभासदा ला allotment letter देईल ज्याला लीगल मान्यता असेल. त्यामुळे सभासदांना ह्या संबंधी काळजी करण्याचे कारण नाही.

शेवटी सचिव श्री पटवर्धन यांनी सर्वांचे आभार मानून तसेच सर्वमान्य अशी अलोटमेंट ची प्रक्रिया संगणकाच्या माध्यमाने हाताळणारे श्री यशवंत केंजळे, त्यांचे सहकारी श्री प्रणव लेले आणि श्री प्रणव शहा यांचे विशेष कौतुक करून आभार मानले आणि ही विशेष सर्व साधारण सभा संपल्याचे जाहीर केले.

पंच समितीच्यावतीने